# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष) बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

जा.क्र-२०२०/सभा-१४७/(२३)/आ.४ दिनांक : ३१/५/२०२१

**प्रति,**
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय** : दिनांक १२ मे, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४८व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

दिनांक १२ मे, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४८व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आवश्यक

आपली विश्वासू,

DSW 31/5/21

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत माहितीसाठी.**
खाजगी सचिव (मा.मंत्री,पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

...२/-

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे /पुणे /नाशिक/औरंगाबाद /अमरावती/ नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष - ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४८व्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४८वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात गुगल मीट (Google Meet) ॲपद्वारे बुधवार दिनांक १२ मे, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.एकनाथ शिंदे, मंत्री, नगरविकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष.
३) मा.श्री.संजय बनसोडे, राज्यमंत्री, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४) मा.श्री.प्राजक्त तनपुरे, राज्यमंत्री, नगरविकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
५) श्री.संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
६) श्री.महेश पाठक, प्रधान सचिव (न.वि.२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
७) श्री.किशोर राजे निंबाळकर, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.पांडुरंग जाधव, सहसचिव, नगर विकास विभाग
२) श्री.वाय.बी.पाटील, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
३) श्रीमती.दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
४) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.:- १ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १४७व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १४७वी बैठक दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४७व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. :- २** म.जी.प्रा.च्या १४७व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी संपन्न झालेल्या १४७ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४७व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.१२/०५/२०२१ रोजी संपन्न झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत, कार्यक्रम बाब क्र.३ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन-२०२०-२१ चे सुधारित अंदाज व सन-२०२१-२२ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लक्ष)

| अ.क्र. | तपशिल | सन-२०२०-२१ चे सुधारित अंदाज | सन-२०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | ७८९७५.९६ | ८९३३८.९४ |
| २ | महसुली खर्च | ८४००१.१० | ८८५०४.९४ |
| ३ | भांडवली जमा | ३३०२८.५८ | ६६२६७.९५ |
| ४ | भांडवली खर्च | ३३०२८.५८ | ६६२६७.९५ |

असा ठराव करण्यात येतो की,

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन २०२०-२१ साठी रु. १९०.०० कोटी अधिकारी/ कर्मचारी यांना वेतन व भत्यासाठी नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी अनुदान मागितलेले आहे. प्रत्यक्ष वेतन व भत्त्यासाठी लागणारा खर्चाचे सदर अनुदान म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच उर्वरित अनुदान रु.४१.०३ कोटी अनुदान सुध्दा उपलब्ध करुन द्यावे.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दि.०४.१०.२०१९ च्या पत्रान्वये निवृत्ती वेतनासाठी सन २०१७-१८ व सन २०१८-१९ ची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पुरक मागणी द्वारे रु.२०३.६३ कोटी निधी मागणी केली होती. सन २०१९-२० मध्ये नागपुर येथे हिवाळी अधिवेशनात पुरक मागणी द्वारे रु.१३५.०० कोटी अनुदान मंजुर करण्यात आले आहे.

उर्वरित रु.६८.६३ कोटी (रु.२०३.६३ कोटी – १३५.०० कोटी) अनुदान अप्राप्त आहे. तसेच २०१९-२० या वित्तीय वर्षात सेवा निवृत होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता शासनाने २०१९-२० च्या व्हाईट बुक मध्ये रु.३३८.०० कोटी इतकी तरतुद मंजुर करण्यात आली आहे. प्रत्यक्षात खर्च सन २०१९-२० मध्ये रु.२५५.५४ कोटी झाला आहे. शासनाकडुन प्रत्यक्ष अनुदान रु.१५२.०६ कोटी प्राप्त झाले आहे. उर्वरित रु.१०३.४८ कोटी (रु.२५५.५४ कोटी – रु.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१५२.०६ कोटी) अनुदान अप्राप्त आहे. शासनाने रु. १७२.११ कोटी (रु.६८.६३ कोटी + रु.१०३.४८ कोटी) मजीप्राच्या निवृत्ती वेतनासाठी लेखाशिर्ष क्र.२२१५A०५२ अंतर्गत उपलब्ध करुन दयावी.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष क्र.२२१५A०४१ अंतर्गत रु. १७३.१७ कोटी अधिकारी/कर्मचारी यांना वेतन व भत्यासाठी नियमित आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी अनुदान मागितलेले आहे. प्रत्यक्ष वेतन व भत्त्यासाठी लागणारा खर्चाचे सदर अनुदान म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देण्यात यावे.

४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष क्र.२२१५A०५२ अंतर्गत रु. ३२५.३६ कोटी मजीप्राच्या निवृत्ती वेतनासाठी अनुदान मागितलेले आहे. प्रत्यक्ष निवृत्ती वेतनासाठी लागणारा खर्चाचे सदर अनुदान म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देण्यात यावे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ४ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजना मधून होणा-या पुरवठयाच्या दराचा आढावा व सुधारीत दरास मंजूरी

सदर कार्यक्रम बाबी वर सदस्य सचिव यांनी प्रस्तावित पाण्याच्या दर वाढीबाबत संचालक मंडळास अवगत केले.सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्वपक्ष चर्चा झाली. सदर चर्चेत मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा व संचालक मंडळ यांनी सदर प्रचलित पाणी पट्टी दरात १० टक्के वाढ करण्याचे निर्देशित केले.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी पाणी पुरवठयाच्या दर पुढे प्रस्तावित केल्याप्रमाणे दि ०१/०७/२०२१ पासून अथवा ज्या दिवसा पासून अधिसूचित करण्यात येईल त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट-१ | नागरी पाणी पुरवठा योजना | |
| | विवरणपत्र- १ | नागरी भाग |
| | विवरणपत्र- २ | ग्रामिण पाणी पुरवठा योजना |
| परिशिष्ट-२ | विवरणपत्र-३ | पाण्याच्या दरात १० टक्के वाढ |
| | विवरणपत्र-४ | पाण्याच्या दरात १० टक्के वाढ |
| परिशिष्ट-३ | पर्यटन व डोंगराळ क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्र | |
| | विवरणपत्र-५ | पाण्याच्या दरात १० टक्के वाढ |
| | विवरणपत्र-६ | पाण्याच्या उत्पादनात खर्चाप्रमाणे पाण्याचे दर |
| परिशिष्ट-४ | पेरी अर्बन पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा केंद्र | |
| | विवरणपत्र-७ | पाण्याच्या दरात १० टक्के वाढ |
| | विवरणपत्र-८ | पाण्याच्या उत्पादनात खर्चाप्रमाणे पाण्याचे दर |
| परिशिष्ट-५ | पाण्याचा उत्पादक दर जास्त असलेल्या योजना (नागरी) | |
| | विवरणपत्र-९ | देहु |
| | विवरणपत्र-१० | नागरी भाग |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

किशोरजोरिंबाद्कर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ट-६ | पाण्याचा उत्पादक दर जास्त असलेल्या योजना (ग्रामिण) | |
| | विवरणपत्र-११ | माळपठार, लंघापूर |
| | विवरणपत्र-१२ | ग्रामिण भाग |

| | |
|---|---|
| विवरणपत्र-११ | अंबरनाथ बदलापुर पाणी पुरवठा केंद्र |
| विवरणपत्र-१२ | प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्र |
| विवरणपत्र-१३ | ग्रामिण पाणी पुरवठा योजना |

**कार्यक्रम बाब क्र. ५ :-** स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वसुलीसाठी पाणीपट्टीवरील विलंब आकार व कर्जावरील दंडनीय व्याज व म.जी.प्रा.ग्राहकांकरिता व्याज माफीच्या सवलतीची अभय योजना

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.१२/०५/२०२१ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षापासून स्थानिक संस्था व म.जी.प्रा. ग्राहक यांना विलंब आकार व दंडनीय व्याज सवलतीची अभय योजना लागू करण्याबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती स्थानिक संस्था व म.जी.प्रा. ग्राहक यांना विलंब आकार व दंडनीय व्याज सवलतीची अभय योजना लागू करण्याबाबत, कार्यक्रम बाब क्र.५ स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वसुलीसाठी पाणीपट्टीवरील विलंब आकार व कर्जावरील दंडनीय व्याज व म.जी.प्रा ग्राहकांकरिता व्याज माफीच्या सवलतीच्या अभय योजनेस संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षापासून ज्या स्थानिक संस्था व म.जी.प्रा. ग्राहक जे परिशिष्ट अ, ब, क व ड मध्ये नमुद अटी व शर्तींची पूर्तता करतील त्यांनाच विलंब आकार व दंडनीय व्याज सवलतीची अभय योजना लागू करण्यात येईल. यासाठी दि. ३१/०३/२०२१ रोजी देय असलेले विलंब शुल्क व दंडनीय व्याज माफ करणेबाबत शासनास शिफारस करण्यात येत आहे. याबाबत शासनाची मान्यता मिळवून आवश्यक कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा | सदस्य सचिव, |
| मंत्री, पा.पु. व स्वच्छता | म.जी.प्रा. |

**कार्यक्रम बाब क्र. ६ :-** म.जी.प्रा.च्या मालकीच्या सर्व नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात असलेल्या निवासी वसाहतीतील घरांना नवीन वाढीव नळ जोडण्या मंजूर करणे व अनधिकृत नळजोडणी नियमित करण्यासाठी आकारावयाच्या अंशदानाच्या दर कमी करणे व दंडनीय पाणी आकारणीचा कालावधी कमी करणे तसेच व्यावसायिक/वाणिज्य नळ जोडण्या मंजूर करत असताना आकारावयाच्या भांडवली अंशदानाचे दर निश्चित करणेकरिता कार्यक्रम बाब सादर करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.१२/०५/२०२१ रोजी संपन्न झाली. म.जी.प्रा.च्या मालकीच्या सर्व नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या क्षेत्रात असलेल्या निवासी वसाहतीतील घरांना नवीन, वाढीव नळजोडण्या मंजूर करणे व अनधिकृत नळजोडणी नियमित करण्यासाठी आकारवयाच्या भांडवली अंशदानाचा दर कमी करणे व दंडणीय पाणी आकारणीचा कालावधी कमी करणे तसेच व्यावसायिक/वाणिज्य नळ जोडण्या मंजूर करत असताना आकारावयाच्या भांडवली अंशदानाचे दर निश्चित बाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सदर बैठकीत कार्यक्रम बाब क्र.६ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, सर्व नागरी पाणी पुरवठा केंदाच्या क्षेत्रात असलेल्या निवासी व अनिवासी वसाहतीतील संकुलांना/संस्थांना नवीन अथवा वाढीव नळजोडण्या मंजूर करत असताना तसेच अनधिकृत नळजोडणी नियमित करत असताना, खालील प्रमाणे सुधारित दराने भांडवली अंशदान आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) निवासी सदनिका/बंगलो/चाळ इत्यादीकरीता

| अ.क्र | सदनिका/बंगलो/चाळ इत्यादीचे बांधकाम क्षेत्रफळ(Built Up Area) चौ.फुटामध्ये | भांडवली अंशदानाची रक्कम |
|---|---|---|
| १ | ०-५०० | रु.१,५००/- |
| २ | ५०१-१००० | रु.२,५००/- |
| ३ | १००१-१५०० | रु.३,५००/- |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| ४ | १५०१-२००० | रु.५,०००/- |
| ५ | २००१-२५०० | रु.६,५००/- |
| ६ | २५०१ व त्यापेक्षा जास्त | रु.७,५००/- |

आ) अनिवासी खाजगी शाळा/कॅालेज/दवाखाने/इस्पीतळे/कार्यालय/बँका/दुकाने इ.

| अ.क्र. | खाजगीशाळा/कॅालेज/दवाखाने/इस्पीतळे/ कार्यालय/बँका/दुकाने इ बांधकाम क्षेत्रफळ (Build Up Area) चौ.फुटामध्ये | भांडवली अंशदानाची रक्कम |
|---|---|---|
| १ | ०-५०० | रु.६,९००/- |
| २ | ५०१-१००० | रु.११,५००/- |
| ३ | १००१-१५०० | रु.१६,१००/- |
| ४ | १५०१-२००० | रु.२३,०००/- |
| ५ | २००१-२५०० | रु.२९,९००/- |
| ६ | २५०१ व त्यापेक्षा जास्त | रु.३४,५००/- |

तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करण्यासाठी ग्राहकाने अनधिकृतपणे वापरलेल्या पाणी वापरापोटी २४ महिन्यांऐवजी १२ माहिन्यांकरिता दंडनीय पाणी आकारणी करण्यात यावी. अशाप्रकारे अनधिकृत नळजोडण्या नियमित करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयांनी पुढील तीन महिन्यात विशेष मोहिम राबवावी.त्या अंतर्गत अशा मोहिमेला मोठया प्रमाणात व्यापक प्रसिध्दी देवून ग्राहकांना या योजनेत सहभागी होण्यासाठी एक महिन्याची मुदत द्यावी.सहभाग घेतल्यानंतर ग्राहकास भांडवली अंशदानाची व दंडनीय पाणी आकारणीची रक्कम भरण्यास एक महिन्याची मुदत द्यावी. अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करुन घेण्याकरीता विहीत मुदतीत सहभाग घेतलेल्या ग्राहकांबाबत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.मुदतीनंतर म.जी.प्रा.च्या प्रचलित नियमानुसार अशा अनधिकृत नळजोडण्यांबाबत संबंधित ग्राहकांविरुध्द आवश्यक ती कठोर कारवाई विभागीय कार्यालयामार्फत करण्यात यावी.

या बाबत पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ७ :-** जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या कृती आराखडयामध्ये समाविष्ठ असलेल्या प्रस्तावित पाणी पुरवठा योजनांच्या सर्वेक्षणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

कार्यक्रम बाबीनुसार या प्रकरणी सविस्तर माहिती मा.संचालक मंडळासमोर पुढीलप्रमाणे सादर करण्यात आली.

शासनाचे परिपत्रक क्र.जेजेएम-२०१९/प्र.क्र.१६६/पापु-१०, दि.३०.१.२०२० व शासन निर्णय क्र.जजमि-२०१९/प्र.क्र.१३८/पापु-१०/०७ दि.४.९.२०२० अन्वये, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना हाती घेण्याविषयीच्या सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार ग्रामीण भागातील सर्व कुटूंबांना सन २०२४ पर्यंत "हर घर नल से जल" प्रमाणे पाणी पुरवठा करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.

सदर कार्यक्रम विहीत मुदतीत पूर्ण करण्यासाठी, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कृती आराखड्यानुसार हाती घ्यावयाच्या योजनांच्या बाबतीतील अंदाजपत्रके व आराखडे तयार करावयाच्या प्रस्तावित योजनांचे सर्वेक्षणाचे काम तात्काळ हाती घेण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात मजीप्राच्या स्वनिधीतून खर्च करण्यास मान्यता मिळणे विषयीच्या प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यप्रणालीनुसार कार्यवाही करण्यासाठी मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तावित नवीन पाणी पुरवठा योजनांच्या सर्वेक्षणासाठीचा खर्च तात्पुरत्या स्वरुपात मजीप्राच्या स्वनिधीतून भागविण्यास संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. याबाबतची सविस्तर कार्यप्रणालीचा उल्लेख करुन परिपत्रकाव्दारे संबंधितांना आवश्यक सुचना निर्गमित करण्याच्या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ८ :-** नागपूर म.जी.प्रा.प्रादेशिक विभागाच्या अधिपत्याखाली नागपूर येथे असलेल्या कार्यालयीन इमारतीचे दुरुस्तीसाठी व चंद्रपूर तसेच वर्धा येथे नवीन कार्यालयीन इमारती बांधण्यासाठी लागणा-या निधीबाबत.

कार्यक्रम बाबीनुसार या प्रकरणी सविस्तर माहिती मा.संचालक मंडळासमोर पुढीलप्रमाणे सादर करण्यात आली.

**अ) मजीप्राच्या नागपूर येथील तेलंगखेडी येथील कार्यालयीन इमारतीच्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या निधीचा तपशील :-**

१) मजीप्राच्या नागपूर येथील विविध कार्यालयांसाठी तेलंगखेडी येथे मजीप्राच्या मालकीच्या दोन इमारती जानेवारी २००० मध्ये पुर्ण करण्यात येऊन वापरात आहेत.

२) **अ)** इमारत "अ" मध्ये तळमजला, पहिला मजला व दुसरा मजला असून, या इमारतीत मजीप्रा मंडळ, नागपूर, मुख्य अभियंता कार्यालय, गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांची कार्यालये कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे या इमारतीत उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या कार्यालयास भाड्याने देण्यात आले आहे.

**ब)** इमारत "ब" मध्ये तळमजला, पहिला मजला व दुसरा मजला असून, कार्यकारी अभियंता, मजीप्रा वि., नागपूर, जलव्यवस्थापन उपविभाग, नागपूर, उपविभाग क्र.१, २ व ४ नागपूर, कार्यकारी अभियंता, मजीप्रा जलव्यवस्थापन विभाग., नागपूर, यांची कार्यालये कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे या इमारतीत वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या कार्यालयास भाड्याने देण्यात आले आहे.

३) वरील इमारती बांधून २० वर्षांचा कालावधी झालेला आहे. १० वर्षापूर्वी एकदा इमारतींना रंगरंगोटी करण्यात आलेली आहे. या इमारतीमध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्तींची कामे करणे आवश्यक आहे. दोन्ही इमारतींमध्ये छतामधून मोठ्या प्रमाणात गळती होते. इलेक्ट्रीफिकेशनचे काम करणे, सॅनिटरी ब्लॉकमधील ड्रेनेज सिस्टीम खराब झाल्याने त्यांची दुरुस्ती करणे, आवश्यक त्या ठिकाणी फ्लोअरिंग दुरुस्ती करणे, वॉटरप्रुफींग, पेन्टींग, इलेक्ट्रीफिकेशन व ड्रेनेज सिस्टीम दुरुस्ती करणे व इतर किरकोळ कामांसाठी रु.१६१.५३ लक्ष अपेक्षित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

(किशोरराजे निंबाळकर)
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ब) चंद्रपूर येथील मजीप्राचे मंडळ कार्यालय, विभागीय कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालयांसाठी नवीन इमारती बांधण्यासाठी लागणाऱ्या निधीचा तपशील :-**

१) चंद्रपूर मंडळ कार्यालय सध्या भाड्याच्या इमारतीत आहे. चंद्रपूर विभागीय कार्यालय व चंद्रपूर उपविभागीय कार्यालय ही दोन्ही कार्यालये चंद्रपूर पाणी पुरवठा योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या दोन वेगवेगळ्या उंच जलकुंभाच्या खाली कार्यरत होते. तथापि, विभागीय कार्यालय असलेल्या जलकुंभाचे आयुष्यमान संपुष्टात आल्याने स्ट्रक्चरल ऑडीटच्या अहवालानुसार सदर जलकुंभ तोडण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका यांनी मजीप्राचे कार्यालय दुसरीकडे स्थलांतरीत करणेबाबत पत्रव्यवहारार केला. त्यानुसार मजीप्राच्या मालकीच्या अधीक्षक अभियंता व इतर निवासस्थानामध्ये विभागीय कार्यालय, उपविभागीय कार्यालय व यांत्रिकी युनिट स्थलांतरीत करण्यात आली आहेत.

२) चंद्रपूर येथील मजीप्राच्या मालकीच्या जागेत चंद्रपूर मंडळ कार्यालय, विभागीय कार्यालय, उपविभागीय कार्यालय व यांत्रिकी युनिट या कार्यालयांसाठी नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी अंदाजे रु.३१५.१२ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे चंद्रपूर येथील मजीप्राचे मंडळ कार्यालय, विभागीय कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालयांसाठी नवीन इमारतींचे बांधकाम करताना कार्यालयीन कामाच्या संदर्भात चंद्रपूर येथे येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता १ व्हीआयपी सूट व १ सर्वसाधारण सूट चा समावेश असलेल्या विश्रामगृहाची तरतूद करण्याविषयी मा. संचालक मंडळाने सूचित केले आहे. त्यानुसार, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर यांनी कार्यवाही करावी.

**क) वर्धा येथील मजीप्राच्या मालकीच्या जागेत विभागीय कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालयांसाठी नवीन इमारती बांधण्यासाठी लागणाऱ्या निधीचा तपशील :-**

१) वर्धा येथे मजीप्राच्या मालकीची जागा असून, या जागेवरील इमारतीमध्ये मजीप्रा विभाग, वर्धा व इतर दोन उपविभागीय कार्यालये कार्यरत आहेत. सदर इमारत ४० वर्षांपूर्वी तात्पुरत्या स्वरुपात बांधण्यात आलेली होती. सदर इमारत मोडकळीस आलेली आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

किशोरराजे निंबाळकर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

त्यामुळे या जागेवर मजीप्रा विभाग, वर्धा व इतर दोन उपविभागीय कार्यालयांसाठी नवीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी यासाठी अंदाजे रु.२०६.३० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे वर्धा येथील मजीप्राचे मंडळ कार्यालय, विभागीय कार्यालय तसेच उपविभागीय कार्यालयांसाठी नवीन इमारतींचे बांधकाम करताना कार्यालयीन कामाच्या संदर्भात वर्धा येथे येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता १ व्हीआयपी सूट व १ सर्वसाधारण सूट चा समावेश असलेल्या विश्रामगृहाची तरतूद करण्याविषयी मा. संचालक मंडळाने सूचित केले आहे. त्यानुसार, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागपूर यांनी कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे कामांसाठीचा रु.६८२.९५ लक्ष इतका खर्चाची तरतूद मजीप्राच्या स्वनिधीतून करण्यास मान्यता देण्याविषयीच्या प्रस्तावावर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे जळगाव येथील कार्यालयीन इमारत व विश्रामगृह येथील अत्यावश्यक दुरुस्ती करण्याविषयी मा.संचालक मंडळाच्या बैठकीत ठरले.

वरीलप्रमाणे मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

नागपूर प्रादेशिक विभागांतर्गत चंद्रपूर व वर्धा येथील कार्यालयीन इमारती बांधणे, नागपूर येथील कार्यालयीन इमारतींच्या दुरुस्त्या करणे यासाठी रु.६८२.९५ लक्ष इतका खर्चाची तरतूद मजीप्राच्या स्वनिधीतून करण्यास व निधी उपलब्ध करुन देण्यास त्याच प्रमाणे जळगाव येथील कार्यालयीन इमारत व विश्रामगृह येथील अत्यावश्यक दुरुस्ती करण्यास तसेच वर्धा व चंद्रपूर येथे नवीन इमारतींचे बांधकाम करताना कार्यालयीन कामाच्या संदर्भात वर्धा व चंद्रपूर येथे येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता १ व्हीआयपी सूट व १ सर्वसाधारण सूट चा समावेश असलेल्या विश्रामगृहाची तरतूद करण्यास व याबाबतीत सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन, त्यास मुख्य अभियंता, नागपूर/नाशिक यांनी तांत्रिक मंजूरी देऊन ई-निविदा प्रक्रियेनुसार सदर कामांची अंमलबजावणी करण्यास संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्याकरिता मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ९ :-** शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.सांगोला जि.सोलापूर दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे हस्तांतरण करणेबाबत.

शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सन २००३ मध्ये कार्यान्वित करून योजनेची कामे सन २००५ मध्ये पुर्ण करण्यात आली. योजनेची कामे पुर्ण झाल्यानंतर योजना मजीप्रा कडून जिल्हा परिषद, सोलापूर यांना हस्तांतरण करण्याबाबत प्रयत्न करण्यात आला. तथापि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संचालक मंडळाच्या दि.२५.५.२००५ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीच्या इतिवृत्तातील कार्यक्रम बाब क्र.६ नुसार सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे १५ वर्षाकरीता चालविण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार तसेच शासन निर्णय ग्रापापु-१००५/प्र.क्र.१३६/पापु-७ मुंबई दि.१०/०८/२००५ नुसार सदर योजना मजीप्रा मार्फत चालविण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. संचालक मंडळाच्या १०४ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार सदर योजना दैनंदिनी देखभाल व दुरुस्तीसाठी मजीप्राने योजना चालवून थेट ग्राहकाकडुन पाणीपट्टी वसुली करणेबाबत प्रथम १५ वर्षाचा कालावधी करीता मान्यता देण्यात आली. तसेच सदरील योजना चालविण्याकरीता दर वर्षी प्राधिकरणास जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करुन त्याची प्रतिपुर्ती मागण्यासही मान्यता देण्यात आली. प्रथम १५ वर्षाकरीता योजना चालविण्याची मुदत मार्च २०२० मध्ये संपली असून त्यानंतरही योजना मजीप्रामार्फत चालविण्यात येत आहे. मजीप्रामार्फत योजना चालविण्याची मुदत मार्च २०२० रोजी संपल्यामुळे पुढील देखभाल दुरुस्तीकरीता योजना जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे हस्तांतरण करणे आवश्यकता आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सदर योजना चालवण्याची मुदत मार्च २०२० अखेर संपलेली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे योजना पुढील देखभाल व दुरुस्तीकरीता हस्तांतरित करण्याबाबत पत्र व्यवहार सुरु आहे, परंतु, अद्याप जिल्हा परिषद सोलापूर यांचे कडून योजना हस्तांतरण करुन घेण्याबाबत कोणताही प्रतिसाद मिळत नाही. सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे तांत्रिक, वर्ग-क व वर्ग-ड (जलसेवक) अधिकारी/ कर्मचारीवर्ग कमी असल्यामुळे योजना कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यामार्फत चालविण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर योजनेतून ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. योजनेद्वारे टंचाई कालावधीमध्ये सर्वसाधारण ७५ गावे पाणी घेतात तर वर्षभर किमान १२ गावे पाणी घेतात. योजनेवरील खर्च व मिळणारे उत्पन्न तसेच मजीप्रकडील अपुरा अधिकारी / कर्मचारी वर्ग हि बाब विचारात घेता सदर योजना दैनंदिन देखभाल व दुरुस्तीकरीता जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास मा.संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली व त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

१) शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. सांगोला. जि. सोलापूर, तात्काळ दैनंदिन देखभाल व दुरुस्तीकरीता जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे हस्तांतरित करण्यात यावी.

२) योजना मजीप्रामार्फत चालविण्याकरिता हस्तांतरणापर्यंत मजीप्राला जी काही आर्थिक तुट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करून त्याची प्रतिपूर्ती मागणी करण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १० :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नवी मुंबई (सीबीडी बेलापूर, नेरुळ व वाशी) परिसरातील विखुरलेल्या निवासस्थानांच्या विक्रीबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नवी मुंबई (सीबीडी बेलापूर, नेरुळ व वाशी) परिसरातील विखुरलेल्या निवासस्थानांच्या विक्रीबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यात (Deferred) आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ११ :-** खामगांव पाणी पुरवठा योजना ठोक स्वरुपाऐवजी थेट ग्राहकांपर्यंत दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता नगरपरिषद खामगांवकडे हस्तांतरीत करण्याबाबत.

खामगांव पाणी पुरवठा योजना सन १९८३ ते १९९० या कालावधीत राबविण्यात आलेली असून रु.४४८.०४ लक्ष रकमेच्या योजनेची मालकी नगरपरिषद खामगांवची आहे तसेच योजनेवरील सर्व विद्युत जोडण्या नगर परिषद खामगांवच्या नावाने आहेत. योजनेची कामे पूर्ण झाल्यावर योजना नगरपालिकेकडे देखभाल व दुरुस्तीकरीता हस्तांतरीत न झाल्याने हेडवर्क्स व पाण्याच्या टाकीपर्यंत देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. सध्यस्थितीत नळकनेक्शन देणे व त्याची वसुली नगर परिषद, खामगांव मार्फत करण्यात येते. खामगांव शहरास म.जी.प्रा.मार्फत ठोक स्वरुपात पाणी पुरवठा केला जात असून वितरण व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती, आकारणी व वसुली सद्यस्थितीत नगरपरिषद खामगांव मार्फत केली जाते.

सदर योजना चालविल्यापोटी मजीप्राची खामगांव नगरपरिषदकडे एप्रिल २०१७ पर्यंतची थकबाकीची रक्कम रु.४३.९४ कोटी असून ऑगस्ट २०२० पर्यंतची थकबाकीची रक्कम रु.५२.७५ कोटी झाली आहे. परंतु नगरपरिषदेकडून कार्यवाही करण्यात येत नसल्याने, थकबाकीची रक्कम वाढतच आहे.

कार्यक्रम बाबीमध्ये उल्लेख केलेल्या सर्व मुद्यांच्या बाबतीत सविस्तर चर्चा होऊन मजीप्रामार्फत चालविण्यात येत असलेली खामगांव पाणी पुरवठा योजना खालील अटींच्या अधीन राहून नगरपरिषद, खामगांवकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली व त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

१. सदर योजना ही नगरपरिषदेने आहे त्या स्थितीत हस्तांतरीत करून घेणे अपेक्षित आहे. भविष्यात योजनेची दुरूस्तीची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषदेची राहील. त्याकरीता खामगांव नगरपरिषदे सोबत अपरीवर्तीत करारनामा करण्यात यावा.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२.   खामगांव नगरपालिकेकडे ऑगस्ट २०२० पर्यन्त म.जी.प्रा.चे रु.५२.७५ कोटी थकित असून, त्यापुढील थकीत रक्कम विचारात घेऊन येणारी रक्कम नगरपारिषदेने म.जी.प्रा.स पुढील पाच (५) समान वार्षिक हप्त्यात म.जी.प्रा.कडे भरणा करावी.

३.   सदर रक्कम नगरपारिषदेने समान वार्षिक हप्त्यात म.जी.प्रा.स जमा न केल्यास रक्कम नगरपारिषदेच्या शासकीय अनुदानातून वसूल करण्यास नगर नगरपरिषदेची कुठलीहीहरकत राहणार नाही अशी अट करारनाम्यात समाविष्ट करून सोबत ठराव करुन घ्यावा.

४.   सदर पाणी पुरवठा योजना हस्तांतर करण्याबाबत नगरपालिकेशी रितसर करारनामा झाल्यानंतर हस्तांतर करण्याची कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मुख्य अभियंता, मजीप्रा, अमरावती यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १२ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गट-क संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अस्थापनेवरील गट-क संवर्गातील कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृतीमुळे दिवसें-दिवस कमी कमी होत आहेत. तसेच पुढील वर्षात बहुतांश कार्यरत कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात गट-क संवर्गाची भरती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक बिकट स्थितीचे कारणास्तव बंद आहे. अशा स्थितीत निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा कार्यभार कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त स्वरुपात सोपवून कार्यालयीन काम काज करुन घ्यावे लागत आहे. तथापि, मूळ पदाचे कामाचा भार जास्त असल्याने, कार्यरत कर्मचाऱ्यांकडून अतिरिक्त स्वरुपात सोपविलेल्या कामाचा वेळेत निपटारा होत नसल्याने कार्यालयीन कामकाजास विलंब होत आहे. या अनुषंगाने उपरोक्त कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन संचालक मंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-**

ठराव असा पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र .संकीर्ण-२७१५/ प्रक्र.१००/ १३/ दि.१७ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रिक्त पदांच्या ७०% प्रमाणे खालील पदे भरणे आवश्यक आहे.

**अ)** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालयाच्या आस्थापनेवर गट-"क" संवर्गाच्या आकृतिबंधानुसार मंजूर पदे/ भरलेली पदे व रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | संवर्ग गट-क | मंजूर पदे | भरलेली पदे (सध्या कार्यरत) | रिक्त पदे | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यासन अधिकारी/ अधीक्षक | ५ | २ | ३ | |
| २ | प्रथम लिपीक | ७ | ४ | ३ | |
| ३ | वरिष्ठ लिपीक | २५ | १७ | ८ | |
| ४ | कनिष्ठ लिपीक | ७० | २० | ५० | |

**ब)** शासन निर्णयातील तरतूदीनुसार रिक्त पदांच्या ७०% प्रमाणे खालील पदे भरणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | संवर्ग गट-क | रिक्त पदांच्या ७० % | प्रत्यक्षात विवक्षित कामासाठी आवश्यक असलेल्या पदांची संख्या. | सेवानिवृत्ती नंतर विवक्षित कार्यालयीन कामकाजासाठी सद्या कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे नांवे |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यासन अधिकारी/ अधीक्षक | २ | २ | - |
| २ | प्रथम लिपीक | २ | २ | - |
| ३ | वरिष्ठ लिपीक | ६ | ६ | १) श्री. विकास म्हात्रे.<br>२) श्री. अल्ताफ पावले<br>३) श्री. संजय खोडके<br>४) श्री. महादेव कस्तुरे |
| ४ | कनिष्ठ लिपीक | ३५ | ७ | १) सौ. ज्योत्स्ना शिर्के<br>२) श्री. अरविंद पाटील<br>३) वसंत मुसळे<br>४) श्री. भालचंद्र भोईर |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

किशोरराजे निंबाळकर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंजूर/ कार्यरत व रिक्त पदांचे अवलोकन करता, गट-"क" मधील लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असून, पुढेही अल्प कालावधीत मोठ्या प्रमाणावर पदे सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार असल्याने, रिक्त पदांअभावी कार्यालयीन कामकाज करणे फारच अडचणीचे होत आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र .संकीर्ण-२७१५/ प्रक्र.१००/ १३/ दि.१७ डिसेंबर २०१६ अन्वये केवळ गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गिय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करारपध्दतीने नियुक्ती देण्याची तरतूद आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील गट-"क" संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक कर्मचाऱ्यांना प्रलंबित कामाच्या आवश्यकतेनुसार विशेष बाब म्हणून करारपध्दतीने विवक्षित कामासाठी ११ महिन्यासाठी नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १३ :-** संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक या संस्थेस म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून रु.५ कोटी उपलब्ध करुन देणेबाबत.

मीत्रा संस्थेचे भविष्यातील कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मजीप्राच्या घसारा निधीतून रु.५ कोटी इतकी रक्कम मीत्रा संस्थेस प्राथमिक स्वरुपाची मदत म्हणून उपलब्ध करुन देण्याविषयीच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन संचालक मंडळामार्फत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

या प्रकरणी रु.५ कोटी इतका निधी मीत्रा संस्थेसाठी Earmark करुन ठेवावा. मात्र, प्रत्यक्षात निधी मीत्रा संस्थेकडे वर्ग करण्यात येऊ नये. या निधीतून प्राप्त होणाऱ्या व्याजाची रक्कम मीत्रा संस्थेस आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात यावा. मा. संचालक मंडळाने मान्यता दिली. यासाठीची पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

किशोरराजे निंबाळकर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १४ :-** जळगांव येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे एक मंडळ कार्यालय स्थापन करण्याबाबत.

जळगांव येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे एक मंडळ कार्यालय निर्मिती करण्याबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन संचालक मंडळामार्फत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

ठराव असा पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये जळगांव येथे एक नवीन मंडळ कार्यालय स्थापन करण्याबाबत संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. व यासंदर्भाने पुढील अनुषंगिक कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे

**कार्यक्रम बाब क्र. १५ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालू असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या कामासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी) यांच्या सेवा बाहय यंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेण्याबाबत.

म.जी.प्रा.च्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील एकुण ५२४ अभियंते कार्यरत आहेत. या ५२४ कार्यरत अभियंत्यांपैकी जवळ जवळ १२७ अभियंते जिल्हा परिषद, नपा/मनपा व इत्यादीकडे प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. हे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले १२७ अभियंते ५२४ मधुन वगळता म.जी.प्रा.कडे ३९७ इतकेच व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या संवर्गातील फक्त ४१ अभियंते कार्यरत आहेत. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सद्यस्थितीत २२६०८.६६ कोटीची पाणी पुरवठा योजनांची कामे चालू आहेत. ही चालू असलेली कामे कार्यरत अभियंते यांचेकडून करुन घेणे अडचणीचे होत असून त्याचा विपरीत परिणाम कामांवर होत आहे. या कारणास्तव या दोन्ही संवर्गातील अभियंते उपलब्ध करुन देणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रादेशिक विभागांकडून सतत मागणी होत आहे.

याअनुंषगाने सविस्तर चर्चा होऊन संचालक मंडळामार्फत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

अध्यक्ष तथा

सदस्य सचिव,

**ठराव :-**

असा ठराव पारीत करण्यात येतो की, शासन निर्णय, वित्त विभागक्र.पदनि २०१८/प्र.क्र.११३/आ.पु.क., दिनांक ११ डिसेंबर, २०१८ अन्वये शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २/८/२०१६ परि.क्र.४ (अ) :गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील तांत्रिक कौशल्य आवश्यक असलेल्या पदांच्या ७० टक्के इतक्या मर्यादेत "काल्पनिक पदे"निर्माण करुन ती बाहय यंत्रणेव्दारे भरण्याची तरतुद आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, म.जी.प्रा.च्या पदांचा नवीन आढावा मंजूरीसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास सादर केलेला आहे. ही बाब विचारात घेऊन कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) या संवर्गाच्या पदांच्या आवश्यकतेनुसार परंतु ७० टक्केच्या मर्यादेत काल्पनिक पदे बाहय यंत्रणेकडून भरणा करण्यास मान्यता देण्यात येत असून याअनुषंगाने कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्यावेळी घ्यावयाचे विषय**

संचालक मंडळाच्या बैठकीत मा.राज्यमंत्री यांनी उदगीर, जळकोट, देवनी इत्यादी उपविभागांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे एक विभाग कार्यालय उदगिर येथे नव्याने निर्मिती करणे आवश्यक असल्याबाबत ठराव मांडला. याअनुषंगाने चर्चा होऊन तेथील चालू, प्रगतीपथावरील व प्रस्तावित कामे याबाबतचा अहवाल मुख्य अभियंता, म.जी.प्रा.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचेकडून मागविण्याचे ठरले. व सदरील अहवाल प्राप्त झाल्यावर यासंदर्भाने निर्णय घेण्याचे ठरले.

अध्यक्ष तथा

सदस्य सचिव,